# १९. गे मायभू

**सुरेश भट** (१९३२-२००३) : सुप्रसिद्ध कवी, गझलकार. सुरेश भट यांचे खरे सामर्थ्य त्यांच्या राजकीय, सामाजिक आशयाच्या कवितांतून जाणवते. 'रूपगंधा', 'रंग माझा वेगळा', 'एल्गार', 'झंझावात' हे त्यांचे काव्यसंग्रह प्रसिद्ध आहेत. त्यांनी 'गझल' या रचनाबंधाचा निष्ठापूर्वक स्वीकार व प्रसार केला. त्यांच्यामुळे 'गझल' हा प्रकार मराठीत अत्यंत लोकप्रिय झाला. 'काफला' या संपादित संग्रहात त्यांच्या काही निवडक गझलांचा समावेश आहे.

मातृभूमी आपणाला वाढवते, सर्वांगाने घडवते. आपल्या जीवनात आईइतकेच मातृभूमीला अनन्यसाधारण महत्त्व असते. त्यामुळे मातृभूमीच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी काय नि किती करावे असे कवीला सतत वाटत राहते. प्रस्तुत कवितेत आपल्या अंत:करणातील मातृभूमीविषयीचा अतीव आदर कवीने अतिशय गौरवपूर्ण रीतीने व्यक्त केला आहे.

- ऐका. वाचा. म्हणा.


**गे मायभू तुझे मी फेडीन पांग सारे;**
**आणीन आरतीला हे सूर्य, चंद्र, तारे.**

**आई, तुझ्यापुढे मी आहे अजून तान्हा;**
**शब्दात सोड माझ्या आता हळूच पान्हा.**

**आई, तुझ्यापुढे ही माझी व्यथा कशाला ?**
**जेव्हा तुझ्यामुळे ह्या जन्मास अर्थ आला.**

**मी पायधूळ घेतो जेव्हा तुझी जराशी,**
**माझी ललाटरेषा बनते प्रयाग काशी.**

**आई, तुझी अशी मी गाईन रोज गाणी;**
**माझी तुझ्या दुधाने गेली भिजून वाणी!**





## स्वाध्याय

**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) कवी कुणाचे पांग फेडू इच्छितो?
(आ) मातृभूमीची आरती करण्याची कवीची साधने कोणती?
(इ) कवीच्या जन्माला कुणामुळे अर्थ प्राप्त झाला?

**प्र. २. खालील काव्यपंक्तींचा तुम्हांला समजलेला अर्थ स्पष्ट करा.**

(अ) आणीन आरतीला हे सूर्य, चंद्र, तारे–
(आ) आई, तुझ्यापुढे मी आहे अजून तान्हा–

**प्र. ३. हे केव्हा घडते ते लिहा.**

(अ) कवीची ललाटरेषा प्रयाग काशी बनते............
(आ) कवी मातृभूमीची उत्तम गाणी गाऊ शकतो............

**प्र. ४. खालील अर्थाच्या कवितेतील ओळी शोधून लिहा.**

(अ) माझी भाषा मधुर आणि समृद्ध बनव.
(आ) शब्दसामर्थ्य, प्रतिभासामर्थ्य प्राप्त झाल्याने गाणे गाईन.

**प्र. ५. कवितेत आलेले दोन वाक्प्रचार शोधा व त्यांचा वाक्यांत उपयोग करा.**

**प्र. ६. कवितेतील यमक जुळणारे शब्द शोधून लिहा.**

**प्र. ७. स्वमत.**

(अ) कवीने पायधूळ कशाला म्हटले असावे, ते स्पष्ट करा.
(आ) 'गे मायभू तुझे मी फेडीन पांग सारे' या ओळीचा सरळ अर्थ लिहा.
(इ) कवितेतून व्यक्त झालेली मातृभूमीविषयीची भावना तुमच्या शब्दांत लिहा.



### चर्चा करूया.

- आताच्या काळात भारतभूमीचे पांग फेडण्यासाठी तुम्ही काय कराल, याची गटात चर्चा करा व वर्गात सांगा.

**उपक्रम :**

(१) आपल्या मायभूचे पांग फेडण्यासाठी काम केलेल्या पाच लोकांची माहिती मिळवा. वर्गात सांगा.
(२) स्वातंत्र्यवीर सावरकरांची 'सागरास' ही कविता मिळवून वाचा.

HCL4RF